शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृतीचे सन २०१९-२० साठी ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबतचे विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग यांचे जा.क्र विससं/उशि/कोवि/शिष्य/२०१९/३७७० दिनांक १६/०९/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ परिपत्रक नं. ४००
दि. 19 SEP 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विसस/उशि/कोवि/शिष्य/२०१९/ 3770 दिनांक :१६/०९/२०१९

प्रति,

१.कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,

२.प्राचार्य,शासकीय,अशासकीय,अनुदानित,विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

**विषय:- महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे सन २०१९-२० साठी ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.**
**संदर्भ :-संचालनालयाकडील पत्र दि.१३/९/२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण,पुणे यांच्याकडील संदर्भिय पत्रांचे अवलोकन करून आपण शिष्यवृत्ती २०१९-२० बाबत आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

**सोबत- संचालनालयाकडील संदर्भिय पत्रे.**

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं-२०१९/शा.सं.शिष्यवृत्ती/परिपत्रक/ 11787 दिनांक-१३/०९/२०१९

13 SEP 2019

परिपत्रक

**विषय:- शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१९-२० साठी mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.**

संदर्भ:-१) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजना विभाग क्र. एससीएच १०८२/४१९९/विशि-३ दि.१३ऑगस्ट, १९८५.

२) शासन निर्णय क्र. एस.सी.एच.२००३/(४०५/०३)/मशि-१ दि.०५फेब्रुवारी, २००४.

राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एचडी. करता यावी या उद्देशाने ही शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्ती संदर्भीय शासन निर्णय १ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी एकूण १४ संच निर्धारीत केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे:-

**१) महाविद्यालयीन स्तर**

| | |
|---|---|
| १) शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | ०३ |
| २) शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०३ |
| ३) शासकीय विज्ञान संस्था,औरंगाबाद | ०३ |
| ४) शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती | ०१ |
| ५) वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ०१ |
| **एकूण-** | **११** |

**२) राज्यस्तर:-**

शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर गठित केलेल्या समितीमार्फत -३ संच असे एकुण -१४ संच आहेत.

आपल्या महाविद्यालय/संस्था/विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१९-२० साठी ऑन- लाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. मात्र या शिष्यवृत्तीसाठी अद्यापपर्यंत एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आपण सदर योजनेची प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

तसेच सन २०१८-१९ यावर्षी सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१९-२० साठी नुतनीकरणाचा अर्ज mahadbt portal वर online भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच सन २०१९-२० मध्ये नवीन अर्ज सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीची माहिती देऊन mahadbt portal वर online अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहीत करावे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी आपल्या महाविद्यालयाकडून/संस्थेकडून या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसिध्दी करावी.

(डॉ. विजय नारखेडे)
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत कार्यवाहीस्तव:-

१) सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये.
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई.
४) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर
५) संचालक, शासकीय विज्ञान संस्था,औरंगाबाद.
६) प्राचार्य, शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती.
७) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर.